# जिल्हा रुग्णालयातील ऑक्सिजन प्रकल्प कार्यान्वित

By लोकमत न्यूज नेटवर्क | Published: April 28, 2021 05:00 AM

जिल्ह्यात सर्वत्र कोरोना संसर्गाचा उद्रेक झाला आहे. रुग्णांना उपचारासोबतच ऑक्सिजनचीही निकड असते. रुग्णांची संख्या अचानक वाढल्याने ऑक्सिजनचाही तुटवडा निर्माण झाला. विविध ठिकाणावरून ऑक्सिजनचे सिलिंडर्स बोलावून रुग्णांचे प्राण वाचविण्याची धडपड सुरू आहे. मात्र बाहेरून येणारा सिलिंडर्स वेळेवर कामी पडेलच याची खात्री नसते. त्यामुळेच जिल्हाधिकारी संदीप कदम यांनी सातत्याने पाठपुरावा करून जिल्हा सामान्य रुग्णालयात ऑक्सिजन प्रकल्प उभारला.




आपला ब्राउझिंगचा अनुभव अधिक चांगला व्हावा, तुम्हाला तुमच्या आवडीच्या मजकुराची शिफारस करता यावी, यासाठी ही वेबसाईट कुकी किंवा तत्सम तंत्रज्ञान वापरते. आमची वेबसाईट वापरणं सुरू ठेवून आपण आमच्या गोपनीयता धोरणाला आणि कुकी धोरणाला सहमती देता.

ओके

**ठळक मुद्दे**

५०० क्युबीक मीटर क्षमता : २४ तासात ११० जम्बो सिलिंडर्स ऑक्सिजन निर्मिती

लोकमत न्यूज नेटवर्क

भंडारा : कोणताही रुग्ण प्राणवायूविना तडफडून मरू नये यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. याचाच एक भाग म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालयात ऑक्सिजन प्रकल्प सोमवारी कार्यान्वित करण्यात आला. ५०० क्युबिक मीटर क्षमता असलेल्या या प्रकल्पातून २४ तासात ११० जम्बो सिलिंडर्स भरले जाणार आहेत. थेट सेंट्रलाइज प्रणालीद्वारे आयसीयू आणि आयसोलेशन वॉर्डात ऑक्सिजनचा पुरवठा केला जाणार आहे. यामुळे जिल्ह्याला मोठा दिलासा मिळाला आहे.

जिल्ह्यात सर्वत्र कोरोना संसर्गाचा उद्रेक झाला आहे. रुग्णांना उपचारासोबतच ऑक्सिजनचीही निकड असते. रुग्णांची संख्या अचानक वाढल्याने ऑक्सिजनचाही तुटवडा निर्माण झाला. विविध ठिकाणावरून ऑक्सिजनचे सिलिंडर्स बोलावून रुग्णांचे प्राण वाचविण्याची धडपड सुरू आहे. मात्र बाहेरून येणारा सिलिंडर्स वेळेवर कामी पडेलच याची खात्री नसते. त्यामुळेच जिल्हाधिकारी संदीप कदम यांनी सातत्याने पाठपुरावा करून जिल्हा सामान्य रुग्णालयात ऑक्सिजन प्रकल्प उभारला. केंद्र सरकारच्या योजनेतून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पासाठी ७० लाख रुपये ख करण्यात आले आहेत. अतिशय कमी वेळात हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला.

News Hub

जिल्हा सामान्य रुग्णालयात यासाठी संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. ५०० क्युबिक मीटर ऑक्सिजन निर्मितीची या प्रकल्पाची क्षमता आहे. २४ तासात ११० जम्बो सिलिंडर्स भरू शकेल एवढा ऑक्सिजन येथे निर्मा केला जाणार आहे. सोमवारी हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरू केला तेव्हा १२ तासात ५० सिलिंडर्स भरण्यात आले.

हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयावर असलेला ऑक्सिजन पुरवठ्याचा ताण कमी झाला आहे. रुग्णांना वेळेवर ऑक्सिजन पुरवठा करणे यामुळे सहज शक्य झाले आहे. जिल्हा रुग्णालयातील या प्रकल्पातून सेंट्रलाइज प्रणालीद्वारे ऑक्सिजन थेट आयसीयू आणि आयसोलेशन वॉर्डात पुरविला जाणार आहे. कोरोना उद्रेकाच्या काळात ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प कार्यान्वित झाल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.यामुळे रुग्णालयातील यंत्रणेवरचा ताण कमी होऊन योग्य उपचार करणे सहज शक्य होणार आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रयत्नांना आले यश**

संवेदनशील म्हणून ओळखले जाणारे जिल्हाधिकारी कोरोना संसर्गाच्या काळात प्रत्येक बाबीवर नजर ठेवून आहेत

आपला ब्राउझिंगचा अनुभव अधिक चांगला व्हावा, तुम्हाला तुमच्या आवडीच्या मजकुराची शिफारस करता यावी, यासाठी ही वेबसाईट कुकी किंवा तत्सम तंत्रज्ञान वापरते. आमची वेबसाईट वापरणं सुरू ठेवून आपण आमच्या गोपनीयता धोरणाला आणि कुकी धोरणाला सहमती देता.

ओके

मिळाला आहे.

ऑक्सिजनची रुग्णांना नितांत गरज असते. हा प्रकल्प अशा रुग्णांना दिलासा देणारा ठरणार आहे. जिल्हा रुग्णालयातील या प्रकल्पातून अहोरात्र ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात येणार आहे. पूर्ण क्षमतेने ऑक्सिजन निर्मितीची चाचणी यशस्वीपणे पार पडली. जिल्हा सामान्य रुग्णालयातील रुग्णांना ऑक्सिजनसाठी प्रतिक्षा करावी लागणार नाही.

-साहेबराव राठोड, नोडल अधिकारी तथा अधीक्षक जिल्हाधिकारी कार्यालय

### वीज गेली तरी ऑक्सिजन पुरवठा सुरू राहणार

जिल्हा सामान्य रुग्णालयातील ऑक्सिजन प्रकल्पाचा वीजपुरवठा खंडित झाला तरी रुग्णांपर्यंत ऑक्सिजनचा पुरवठा थांबणार नाही. येथे जनरेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र वीजपुरवठा खंडित ते जनरेटर सुरू करणे या पाच ते दहा मिनिटांच्या अवधीतही रुग्णांना ऑक्सिजन मिळावा यासाठी ड्युरा सिलिंडर्सची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. सेंट्रलाइज पाइपलाइनच्या माध्यमातून ड्युरा सिलिंडर्समधून ऑक्सिजनचा पुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे रुग्णांना २४ तास ऑक्सिजनचा पुरवठा करणे शक्य होणार आहे. या प्रकल्पासाठी रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाचेही मोठे सहकार्य लाभले आहे. प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नाईक, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निखील डोकरीमारे यांचे सहकार्य महत्वाचे ठरले.

News Hub

**Web Title:** Oxygen project in operation at district hospital

Get Latest **Marathi News**, **Maharashtra News** and **Live Marathi News Headlines** from Politics, Sports, Entertainment, Business and hyperlocal ne
from all cities of Maharashtra.

Follow

Get Latest Updates in Messenger

**टॅग्स :** hospital | Oxygen Cylinder | हॉस्पिटल | ऑक्सिजन

## भंडारा अधिक बातम्या






आपला ब्राउझिंगचा अनुभव अधिक चांगला व्हावा, तुम्हाला तुमच्या आवडीच्या मजकुराची शिफारस करता यावी, यासाठी ही वेबसाईट कुकी किंवा तत्सम तंत्रज्ञान वापरते. आमची वेबसाईट वापरणं सुरू ठेवून आपण आमच्या गोपनीयता धोरणाला आणि कुकी धोरणाला सहमती देता.

ओके

## IPL 2021 बातम्या



क्रिकेट : IPL 2021: तुम्हाला सुरक्षित घरी पोहोचविण्याची



क्रिकेट : IPL 2021: केकेआरच्या ‘कोड मेसेज’वर



क्रिकेट : IPL 2021, RCB Vs DC T20 Match Highlight



क्रिकेट : IPL 2021, RCB \ DC T20 Live : मोहम्मद

## Azaan Loudspeaker Issue : महाराष्ट्र सरकारचंही ठरलं...; अजानसंदर्भात शिवसेना नेते संजय राऊत यांचं मोठं वक्तव्य

Azaan issue Sanjay Raut big statement Maharashtra home minister has also issued a notice stating how much Decibel level should be there while observing Azaan . खरे तर, कर्नाटकात हिंदू संघटनांनी ...

**Lokmat**

News Hub

## रणबीर-आलिया लग्न बंधनात; नवदाम्पत्याच्या फोटोंवर एक्स गर्लफ्रेंड कतरिना अन् दीपिका म्हणतात...

Ranbir Kapoor Alia Bhatt Married Heres How Deepika Padukone Katrina Kaif Wished Them. रणबी कपूर आणि आलिया भट्ट लग्न बंधनात; रणबीरच्या एक्स गर्लफ्रेंडच्या आलियानं पोस्ट केलेल्या फोटोंवर कमेंट्स - Lates...

**Lokmat**



आपला ब्राउझिंगचा अनुभव अधिक चांगला व्हावा, तुम्हाला तुमच्या आवडीच्या मजकुराची शिफारस करता यावी, यासाठी ही वेबसाईट कुकी किंवा तत्सम तंत्रज्ञान वापरते. आमची वेबसाईट वापरणं सुरू ठेवून आपण आमच्या गोपनीयता धोरणाला आणि कुकी धोरणाला सहमती देता.

ओके

www.lokmattimes.com
epaper.lokmat.com
deepotsav.lokmat.com
lokmat.net

क्रिकेट
शहरं
Epaper
फोटोफ्लिक
मनोरंजन

Copyright © 2020 Lokmat Media Pvt Ltd

News Hub

आपला ब्राउझिंगचा अनुभव अधिक चांगला व्हावा, तुम्हाला तुमच्या आवडीच्या मजकुराची शिफारस करता यावी, यासाठी ही वेबसाईट कुकी किंवा तत्सम तंत्रज्ञान वापरते. आमची वेबसाईट वापरणं सुरू ठेवून आपण आमच्या गोपनीयता धोरणाला आणि कुकी धोरणाला सहमती देता.

ओके